## गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ७ डिसेंबर २०२०.

## अधिसूचना

**महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९.**

क्रमांक बीआरएल १०२०/प्र.क्र.१३२(२)/राउशु-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास असे वाटते की, मुंबई विप्रकृत मद्यार्क नियम, १९५९ मध्ये आणखी सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणावेत आणि म्हणून हे नियम, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम (१९४९ चा पंचवीस) चे कलम १४३ चे पोट-कलम (३) मधील परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे आधी प्रकाशित न करता तात्काळ अंमलात आणावे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १४३ चे पोट-कलम (२) मधील खंड (बी) आणि (यु) आणि सहकलम ५३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत प्रदान करण्यात आलेल्या सर्व अधिकारांचा वापर करून याद्वारे महाराष्ट्र शासन, मुंबई विप्रकृत मद्यार्क नियम, १९५९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे ते असे :—

१. या नियमांना मुंबई विप्रकृत मद्यार्क (सुधारणा) नियम, २०२० असे संबोधण्यात यावे.

२. मुंबई विप्रकृत मद्यार्क नियम, १९५९ (यात यापुढे ज्याचा ‘‘मुख्य नियम’’ असा निर्देश करण्यात आला आहे.), मधील नियम ९ ए मधील ‘‘संचालक, हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, मुंबई’’ या शब्दानंतर ‘‘किंवा संचालक, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे’’ हे शब्द अंतर्भूत करावेत.

३. मुख्य नियमातील नियम १३ मधील पोट-नियम (१) मध्ये ‘‘संचालक, हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, मुंबई’’ या शब्दानंतर ‘‘किंवा संचालक, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे’’ हे शब्द अंतर्भूत करावेत.

४. मुख्य नियमातील जोडपत्र नमुना फॉर्म डी.एस. १ मधील अट क्र. ७ (१), (२) व (३) मधील ‘‘संचालक, हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, मुंबई’’ या शब्दानंतर ‘‘किंवा संचालक, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे’’ हे शब्द अंतर्भूत करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**यु. ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,

dated the 7th December 2020.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT, 1949.

No. BRL-1020/CR.131(2)/EXC-3.—Whereas the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Bombay Denatured Spirit Rules, 1959, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication, as provided by the provision to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act ( XXV of 1949);

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses (b) and (u) of sub-section (*2*) of section 143 with section 53 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Denatured Spirit Rules, 1959, as follows, namely :—

1. These rules may be called the Bombay Denatured Spirit (Amendment) Rules, 2020.

2. In rule 9A of the Bombay Denatured Spirit Rules, 1959 (hereinafter referred to as "principal Rules"), after the words "Director, Haffkine Institute for Training, Research Testing, Bombay", the words "or Director, Vasantdada Sugar Institute, Pune" shall be added.

3. In rule 13 of the principal Rules, in sub-rule (1), after the words "Director, Haffkine Institute for Training, Research Testing, Bombay", the words "or Director, Vasantdada Sugar Institute, Pune" shall be added.

4. In Form D.S. I appended to the principal Rules, in the condition No. 7 (1), (2) and (3), after the words "Director, Haffkine Institute for Training, Research Testing, Bombay", the words "or Director, Vasantdada Sugar Institute, Pune" shall be added.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Y. B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.